bluebytes
news that matters

संध्यानंद

Monday, July 12, 2010

**Watch more movies: they eat Tobacco**
Publication: Sandhyanand, Edition: Pune, Journalist: Bureau, Page No: 9, Location: Middle-Left, Width(cms): 12, Height(cms): 10, Size(sq.cms): 120

# जास्त चित्रपट पाहणाऱ्यांना तंबाखूचे व्यसन लवकर जडते



सिनेमा किंवा नाटके जास्त प्रमाणात पाहून थिएटरमध्ये जास्त वेळ घालविल्यामुळे तंबाखूचे व्यसन लवकर जडते, असा इशारा एका खासगी संस्थेच्या तज्ज्ञांनी दिला आहे.

नवी मुंबईच्या हिऑलिस सेक्सरिया इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक हेल्थ व हॉर्वर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थच्या संयुक्त विद्यमाने २००५-२००६ मध्ये नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे करण्यात आला होता त्याचे निष्कर्ष आता जाहीर करण्यात आले आहेत. या सर्व्हेचा निष्कर्ष असा की, जे लोक महिन्यातून एक किंवा यापेक्षा जास्त वेळा थिएटरमध्ये सिनेमा किंवा नाटक पाहण्यासाठी जातात त्यांना तंबाखूचे व्यसन लागण्याची १५ ते ५५ टक्के शक्यता असते. यामुळे पुरुषांना तंबाखूची तर महिलांना सिगारेट - बिडी ओढण्याची सवय लागण्याची शक्यता असते.

या मुद्यावर 'सलाम मुंबई फाऊंडेशनच्या' संचालिका पद्मिनी सोमाणी म्हणाल्या की, सर्वसामान्य लोक चित्रपट अभिनेते अभिनेत्रीचे अनुकरण करतात. तरुणांचे तेच आदर्श असतात. चित्रपटात तंबाखूचे दुष्परिणाम दाखविल्यास लोक तंबाखू खाणार नाहीत किंवा धूम्रपान करणे नक्कीच सोडून देतील, असा त्यांनी सल्ला दिला आहे. यामुळे नव्या पिढीला तंबाखू व धूम्रपानाच्या व्यसनापासून वाचविता येईल, असे डॉ. पद्मिनी सोमानी यांनी प्रतिपादन केले आहे.